**“नोव्हेंबर २०२१” या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती ...**

## (क) शासन निर्णय / अधिसूचना

- दिनांक १ नोव्हेंबर २०२१ च्या शासन निर्णयान्वये मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, नाथनगर (उत्तर), पैठण, औरंगाबाद या संस्थेला सन २०२०-२२ करिता अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतन खर्चासाठी ३६-सहायक अनुदान (वेतन) या उद्दिष्टाखाली रु. १३.५३ लाख इतके (चौथा हप्ता) अनुदान मंजूर करण्यात आले आहे.
- दिनांक १ नोव्हेंबर २०२१ च्या शासन निर्णयान्वये डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या संस्थेला सन २०२०-२१ करिता अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतन खर्चासाठी ३६-सहायक अनुदान (वेतन) या उद्दिष्टाखाली रु. २२.०० लाख इतके (तिसरा हप्ता) अनुदान वितरित करण्यात आले आहे.
- दिनांक १ नोव्हेंबर २०२१ च्या शासन आदेशान्वये मंत्रालयीन विभागात भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांच्या सेवापुस्तकांमधील माहिती ई-सेवापुस्तक आज्ञावलीमध्ये भरण्यासाठी अवर सचिव / साप्रवि-९अ यांच्या पर्यवेक्षीय नियंत्रणाखालील ५ लिपिक-टंकलेखकांचा एक गट स्थापन करण्यात आला आहे. यासाठी काही विभागातील ५ कर्मचाऱ्यांच्या सेवा दिनांक ३० नोव्हेंबर २०२१ पर्यंत अधिग्रहित करण्यात आल्या आहेत.
- दिनांक १ नोव्हेंबर २०२१ च्या शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) साठ बाहय यंत्रणेकडून मासिक दराने वाहनचालक पुरविण्यासाठी मे.व्ही.पी.फॅसिलिटी सर्विसेस प्रा.लि., मुंबई यांना दिनांक १ नोव्हेंबर ते ३१ ऑक्टोबर २०२२ या कालावधीसाठी मासिक दरावर ५ वाहनचालक पुरविण्यासाठी दरकरार करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.
- दिनांक ३ नोव्हेंबर २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांची सेवापुस्तके अद्ययावत करण्याबाबत सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.
- दिनांक १० नोव्हेंबर २०२१ च्या शासन निर्णयान्वये मे.साईसिद्धी इंटरप्रायजेस, मुंबई यांना दिनांक १० नोव्हेंबर २०२१ ते ३१ ऑक्टोबर २०२२ या कालावधीत सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) मधील प्रिंटरसाठी रिसायकलिंग केलेले टोनर पुरविण्यास मंजुरी देण्यात आली आहे.
- दिनांक २२ नोव्हेंबर २०२१ च्या शासन निर्णयान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमासाठी सन २०२०-२१ करिता वनामती, नागपूर संस्थेस ३६-सहायक अनुदाने (वेतन) या उद्दिष्टाखाली माहे नोव्हेंबर व डिसेंबर २०२१ च्या वेतनाकरिता रु.९,५५,७९४/- इतके अनुदान वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
- दिनांक २२ नोव्हेंबर २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांनी शासकीय / खाजगी संस्थेकडून पुरस्कार स्वीकारण्यासंदर्भात अखिल भारतीय सेवा (वर्तणूक) नियम १९६८ च्या नियम-१२ मधील तरतुदींस अनुसरुन मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत.

## (ख) प्रशिक्षण / परीक्षा

- दिनांक १७ नोव्हेंबर २०२१ च्या शासन पत्रान्वये राज्य प्रशिक्षण धोरणांतर्गत मंत्रालयीन सहायक कक्ष अधिकारी संवर्गाकरिता दिनांक २२ नोव्हेंबर २०२१ ते ३ डिसेंबर २०२१ या कालावधीत प्रादेशिक कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था (रामेती), पुणे या संस्थेमार्फत सी.आय.आर.टी, भोसरी, पुणे येथे पायाभूत प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे.

## (ग) नियुक्ती / पदोन्नती / प्रपत्र बढती / पदावनती / पदोन्नतीचा मानीव दिनांक व नियमित दिनांक

- एका सहायक कक्ष अधिकाऱ्याचे मंत्रालयीन प्रशासकीय विभागात नियतवाटप करण्यात आले आहे.

**(घ) <u>बदली / मुदतपूर्व बदली / बदलीस स्थगिती / बदली रद्द / पदस्थापनेत बदल / कार्यमुक्त</u>**

- भारतीय प्रशासन सेवेतील ३ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.
- एका सहसचिवाच्या पदस्थापनेत बदल करण्यात आला आहे.
- एका अवर सचिवाच्या बदलीस मुदतवाढ देण्यात आली आहे

*****